प्रकल्प प्रवर्तक मे. कराड हॉस्पिटल असोशिएशन, १२, डबरी, नगरपालिका एस.टी.पी.जवळ, शनिवार पेठ, तालुका-कराड, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility ( CBMWTDF) भस्मीकरण यंत्रणेच्या क्षमतेचे विस्तारिकरण ३०.० किलो प्रति तासावरुन १००.० किलो प्रति तास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त -

---

प्रकल्प प्रवर्तक मे. कराड हॉस्पिटल असोशिएशन, १२, डबरी, नगरपालिका एस.टी.पी.जवळ, शनिवार पेठ, तालुका-कराड, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility § CBMWT & DF) क्षमतेचे विस्तारिकरण ३०.० किलो प्रति तासावरुन १००.० किलो प्रति तास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळ मे. कराड हॉस्पिटल असोशिएशन, १२, डबरी, नगरपालिका एस.टी.पी.जवळ, शनिवार पेठ, तालुका-कराड, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र, येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री अमोल आ. सातपुते, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री नागेश पाटील, अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री प्रशांत गायकवाड, प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६



Scanned with OKEN Scanner

व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे वंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे वंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. कराड हॉस्पिटल असोशिएशन, १२, डबरी, नगरपालिका एस.टी.पी.जवळ, शनिवार पेठ, तालुका-कराड, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र यांचा त्यांच्या कार्यरत सामुहिक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट प्रकल्प (Common Bio-Medical Waste Treatment & Disposal Facility § CBMWT & DF) क्षमतेचे विस्तारिकरण ३०.० किलो प्रति तासावरुन १००.० किलो प्रति तास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक -११-१०-२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला होता.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग वी ७ (डीए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय वदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे वंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्यावावत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात वंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय वदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंवई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी सादर केला व त्या अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी प्राप्त केली.

मा. जिल्हाधिकारी, सातारा यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी गुरुवार , दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ११. ०० वाजता घेण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य



Scanned with OKEN Scanner

सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- १०१ /२०२४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०१११ एफटीएस -०१९९ दिनांक -११-०१-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सातारा,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी<br>प्रादेशिक अधिकारी -पुणे,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>सातारा | - आयोजक |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत २९-१२-२०२३ रोजी जनसुनावणीबाबत प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,

२) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,सातारा

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सातारा

४) तहसीलदार, तहसील कार्यालय-पाटण, तालुका- पाटण, जिल्हा-सातारा,



Scanned with OKEN Scanner

५) ग्रामपंचायत कार्यालय § मुक्काम पोस्ट § मरळी, तालुका-पाटण, जिल्हा- सातारा,

६) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

७) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - २२

९) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ३ रा मजला, जोग सेंटर, जुना मुंबई-पुणे रस्ता, वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,नविन प्रशासकीय इमारत, २रा मजला, एस.टी. स्टॅण्डच्या मागे, सदरबझार, सातारा

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डीग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

Scanned with OKEN Scanner

आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

त्यांनी सांगितले की सदरहू सामुहिक जैव-वैद्यकीय कचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट प्रकल्पाची एकूण खर्च २.०३ कोटी आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये ६७.५३ लाख, तर वार्षिक देखभाल खर्च - रुपये १९.० लाख रुपये आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री उदयसिंह देशमुख, राहणार- शनिवार पेठ,कराड शहर,जिल्हा-साताराः-**

सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने हा प्रकल्प खूपच महत्वाचा आहे. या प्रकल्पामुळे समाजात स्वच्छता ही राखली जाते. वाढत्या लोकसंख्येचा विचार केल्यास या प्रकल्पास वाढीव क्षमता आवश्यक आहे. माझ्या वैयक्तिक मते या प्रकल्पास अतिरिक्त क्षमतेस मंजूरी देणे हे आवश्यक आहे.

२) **श्री एकनाथ खंडायत, राहणार-कराड, जिल्हा-साताराः-**

माझी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की हा जो सर्व प्रकल्प आहे, तो सीसीटीव्हीच्या कव्हरेज/निगराणीत ठेवण्यात यावा. कारण तेथे जे मेडिकल सेग्रेगशन & ग्लव्होज, सिरेंजेस् याचे विलगीकरण होणार आहे, त्याचा पुनर्वापर होऊ नये, याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. तरी त्यावर सीसीटीव्हीचा त्या प्रक्रियेवर लक्ष असणे गरजेचे आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना उत्तर देण्याची सूचना केली.

Scanned with OKEN Scanner

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी मत मांडले अतिशय चांगल प्रश्न विचारण्यात आलेला आहे. तर सदरहू प्रकल्प हा सीसीटीव्हीच्या निगराणात राहिल, त्यामुळे प्रकल्प कामकाजावर लक्ष राहिल.

३) श्री रोहन भाटे, मानद जीवरक्षक सातारा जिल्हाः-

एकंदरीत कराड व आजूबाजूच्या गावांचा विचार केल्यास कराडवर ८० गावांचा ताण आहे. ८० गावातील ग्रामस्थांना कराड येथील विविध वैदकीय सुविधांचा उपयोग करावा लागतो. येथील वैदकीय सेवा व डॉक्टर यांच्यावरिल ताण लक्षात घेणे गरजेचे आहे. गेले तीस वर्षे मी येथील मेडिकल कच-याचे विलगीकरण पाहिले नव्हते. या प्रकल्पामुळे कराड येथील वैदकीय कच-याचे नियोजन व विलगीकरण सुरु झालेले आहे. तर भविष्यात उत्पन्न होणारा वाढीव वैदकीय कचरा लक्षात घेऊन या प्रकल्पाचे विस्तारिकरण करणे गरजेचे आहे. त्यास मी अनुमोदन देत आहे.

४) श्री मुस्सदीक आंबेकरी, कराड, जिल्हा-साताराः-

मी नगरसेवक माझे बंधू मोहसीन आंबेकरी यांच्यातर्फे येथे आलेलो आहे. हा प्रकल्प सुरु केला म्हणून धन्यवाद. नगरपालिका, हॉस्पीटल असोशियनचे विशेष आभार. हॉस्पीटल असोशियनचे अध्यक्ष यांनी येथे सांगितले की हा महाराष्ट्राचा पहिल प्रकल्प आहे. तो होण्याचा सार्थ अभिमान त्यांना आहे, तसाच तो आम्हां कराडवासियांना,नगर परिषदेला आहे. हा जो प्रकल्प प्रकल्प उभा केलेला आहे, तो माझ्या वार्डाशेजारीच आहे. ब-याच वेळा वैदकीय कच-याची गाडी ही शहरातील छोट्या-मोठ्या गल्लीमधून येतात. तरी ती गाडी मुख्य रस्त्याने आणली जावी, त्यामुळे येथील स्थानिकांना अडचण होणार नाही, त्याचप्रमाणे गाडीतील जो वैदकीय कचरा पडतो.तो न पडण्याची काळजी घेण्यात यावी.

येथे मेडिकल असोशिनयचे अध्यक्ष यांनी सांगितले की उपस्थित केलेल्या सूचनेची अंमलबजावणी त्वरित होईल याची १००% ग्वाही देण्यात येते.

५) श्री सतीश पाटील, औषधविक्रेता, कराड, जिल्हा-साताराः-

आम्हांला प्रकल्पाचा फायदा असा होतो की जी औषधे बाद होतात (Expired), ती या प्रकल्पात नियमानुसार हस्तांतरित करण्यात येतात, आणि प्रकल्प प्रवर्तक नियमानुसार शास्त्रीयदृट्या त्याची विल्हेवाट लावतात. औषधविक्रेत्यांना या प्रकल्पाचा फायदाच होत आहे.

६) डॉ. वैभव चव्हाण, सहसचिव, (Joint Secretary) महाराष्ट्र स्टेट इंडियन मेडिकल असोशिएनः-

२००३ ला हा प्रकल्प कराडला सुरु केला, तेव्हा येथील सर्व डॉक्टरांकडून पैसे जमा करुन हा प्रकल्प सुरु केला. गेले वीस वर्षे हा प्रकल्प खूपच चांगल्याप्रकारे चालविला जात आहे.

Scanned with OKEN Scanner

त्यापुर्वी मानवाच्या शरीराचे भाग शस्त्रक्रियेनंतर कचराकुंडीत टाकण्याचे आढळून येत असे. महिलेने बाळास जन्म दिल्यानंतरचा प्लेसेंटा (placenta) हा बाहेर फेकलेला आढळायचा. मात्र सदरहू प्रकल्प सुरु केल्यानंतर गेले वीस वर्षे अशी गोष्टी आढळत नाही, याचा अभिमानाने मी उल्लेख करतो. कारण त्याची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावण्यात येते. महाराष्ट्रातील हा एकमेव प्रकल्प असू शकतो की तो वैदकीय अधिकारी यांनी चालविलेला आहे. बाकीचे २५ प्रकल्प हे इतर लोक चालवत असुन त्यांबाबत ब-याच तक्रारी समाजामध्ये आहेत. मात्र आपल्या प्रकल्पाची तक्रार नाही याचा मला सार्थ अभिमान आहे.

(७) श्री निवृत्ती अप्पा खडनाईक, राहणार-कराड,जिल्हा-सातारा:-

२००१ ला मी येथे राहायला आलो, डाव्या हाताचे पहिले घर माझे आहे. त्यावेळी या रस्त्यावर किडे वळवळत असत. आता स्वच्छता पाळून हा प्रकल्प चालू आहे. मी आनंदी आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

(८) श्री विजय वाटेगावकर, माजी आरोग्य सभापती:-

प्रथम मी मेडिकल असोशियनचे अभिनंदन करतो की त्यांच्या प्रयत्नामुळे कराड शहर हे देशात या प्रकल्पाबाबत पहिल्या नंबरला आलेले आहे. त्याचा आम्हां कराडवासियांना सार्थ अभिमान आहे. माझ्या माहितीप्रमाणे भारत सरकारने या प्रकल्पावर एक शॉर्ट फिल्मसुध्दा तयार केलेली होती. त्यातही आम्हांला पहिला नंबर मिळाला.

माझी सूचना आहे की प्रकल्पात काम करणारे जे कर्मचारी आहेत, त्यांच्या आरोग्याच्या काळजीसाठी त्यांना वैदकीय विमा योजनेचा लाभ द्यावा किंवा निवृत्तीनंतर त्यांच्या आरोग्याची हमी ही प्रकल्प व्यवस्थापनाने घ्यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पातील सर्व कामगारांची वैदकीय तपासणी ही वेळोवेळी होत असते. त्याचप्रमाणे शासनाच्या कामगार कायद्यांनुसार सर्व गोष्टींची पूर्तता केली गेलेली आहे. नियमांप्रमाणे सर्व करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नियमाप्रमाणे १००% वैदकीय कच-याची विल्हेवाट लावण्यात येते.

(९) डॉ. भरत बल्लाळ, राहणार-कराड,जिल्हा-सातारा:-

मी गेले सहा वर्षे जैव-वैदकीय कचरा प्रक्रियेसंदर्भात संशोधन करत असून अनेक जैव-वैदकीय कचरा प्रक्रिया प्रकल्पांना मी भेटी दिलेल्या आहेत. या प्रकल्पांबाबत बैठकीत सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आल्याने मी बोलत आहे. येथे सकारात्मक चर्चा असल्याने मी काही मुद्दे मांडत आहे. येथे आयोजक यांनी विनंती केली की सूचना, आक्षेप या प्रकल्पाबाबतच उपस्थित करण्यात यावेत.



Scanned with OKEN Scanner

डॉ. बल्लाळ यांनी सांगितले की मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत की गोवंडी जैव-वैदकीय कचरा प्रकल्पात सुधारणा करण्यात यावी. त्यांनी आदेश दिले की जैव-वैदकीय कचरा जाळताना जे जीवजीवाणू आहेत, ते droplets & droplet new Cia आहेत. ते वातावरणात राहू शकतात व अनेक कि.मी. जाऊ शकतात. जेव्हा पाच हजार टी.बी. रुग्णांचे अहवाल सादर करण्यात आले, त्यावेळी उच्च न्यायालयाने आदेश दिले, त्यावेळी तेथे आम्ही हवेच्या प्रदूषणाचे नमुने ५० मीटर ते ५.० कि.मी. अंतरापर्यंत घेण्यात आले, त्यावेळी परत आयोजक यांनी विनंती केली की आपण आपल्या सूचना, आक्षेप या प्रकल्पाबाबतच उपस्थित करण्यात याव्यात, इतर संदर्भ देऊ नयेत. या प्रकल्पाविषयी टीकाटिप्पणी, सूचना, आक्षेप नोदवावेत. डॉ. बल्लाळ यांनी सूचना केली की प्रकल्पासून ५० मीटर ते ५.० कि.मी. पर्यत नियमितपणे हवेच्या प्रदूषणाचे सॅम्पल घेण्यात यावेत. जेणेकरुन कराडच्या जनतेचे आरोग्य सुरक्षित राहिल. आता अनेक आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असून ते अंगिकारण्यात यावेत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की शासनाने केलेल्या निर्देशांप्रमाणे सर्व परिषणे करण्यात येतात. हवा प्रदूषण सॅम्पलिग असो किंवा इतर कुठलेही सॅम्पलिंग असो, शासनाचे नियम पाळून ती केला जातात.

१०) श्री सौरम अशोकराव पाटील, नगरसेवक,कराड नगरपरिषद, जिल्हा-सातारा:-

गेले वीस वर्षे एकही दिवसाची सुट्टी न घेता हा प्रकल्प अविरत चालू आहे. याचा आम्हां कराडकरांना अभिमान आहे. तर यात त्रुटी असेल असे आम्हांला वाटत नाही. शासनाशी याबाबत संवाद साधायचा आहे. तसेच बैठकीत हवा प्रदूषण सर्वेक्षणाची मागणी करण्यात आली: तर दत्त चौकात ती सोय आहे. याबाबत जनजागृती करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून माझी नेहमीच तयारी राहिल. प्रकल्पास शुभेच्छा.

११) श्री चंद्रशेखर नकाते, एन्व्हायरो नेचर फ्रेंड -

एन्व्हायरो नेचर फ्रेंड या नात्याने प्रश्न विचारतो. प्रत्येकाच्या घरात न वापरलेली, मुदत संपलेली (Expiry Date) औषधे असतात. नगरपालिकेची घंटागाडी रोज फिरत असते. त्यात एक वेगळा वॉक्स ठेवला, तर त्यात रहिवाशी त्यांची बाद झालेली (Expiry Date झालेली) औषधे टाकू शकतील. एवढी माझी सूचना आहे.

१२) श्री ए.आर.पवार,सॅनिटरी इन्सपेक्टर, कराड नगरपरिषद:-

बैठकीत एन्व्हायरो नेचर फ्रेंड संस्थेतर्फे सूचना करण्यात आली. तर सर्वांच्या माहितीसाठी येथे सांगण्यात येते की कराड नगरपरिषदेची जी घंटा गाडी रोज फिरते, त्यात एक वेगळ्या वॉक्संची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यात सॅनिटरी नॅपकीन्स, मुदत संपलेली औषधे यांची सोय करण्यात आलेली आहे. तरी लोकांनी त्याचा लाभ घ्यावा. हा प्रकल्प अत्यंत



Scanned with OKEN Scanner

स्तुत्य आहे आणि प्रकल्पाचे काम खूपच चांगले चालू आहे. कराड नगरपरिषदेने या मेडिकल असोशियनला प्रकल्पासाठी जागा दिलेली आहे. या प्रकल्पामुळे व इतर वसुंधरा प्रकल्पामुळे कराड नगरपरिषद नेहमीच अग्रेसर राहिली. नगरपरिषदेतर्फे प्रकल्पास शुभेच्छा.

१३) श्री हेमंत केंजळे, सचिव, क्रिएटीव्ह नेचर फ्रेंडः-

हा प्रकल्प पूर्णपणे मला माहित आहे आणि या प्रकल्पास माझे पूर्णपणे अनुमोदन आहे.

१४) श्री प्रशांत गायकवाड, प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-

प्रकल्प प्रवर्तक मे. कराड हॉस्पिटल असोशिएशन यांचा हा CBMWT & DF हा प्रकल्प असून त्यास माझ्या काही सूचना आहेतः-

अ) सदरहू कार्यरत CBMWT & DF चे विस्तारिकरण ३० किलो प्रतितास वरुन १०० किलो प्रतितास करण्याचा प्रकल्प प्रवर्तकांचा मानस आहे. म्हणजे कार्यरत प्रकल्पाची जैव-वैदकीय कचरा गोळा करण्याची, गाड्यांची क्षमता ही ३० किलो प्रतितास असेल. जर १०० किलो प्रति तास करण्याचा मानस आहे, तर त्याप्रमाणे आपली जैव-वैदकीय कचरा गोळा करण्याची, गाड्यांची क्षमता ही १०० किलो प्रति तास एवढी आहे का? कारण CBMWT & DF ची सुरवात ही Collection Facility/गोळा करण्याच्या क्षमतेपासूनच सुरवात होते § प्रत्येक हॉस्पिटलच्या, प्रत्येक डॉक्टरच्या दरवाज्यापासून होते. जर पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालात जर याची नोंद नसेल तर ती करण्यात यावी.

ब) प्रकल्पातील स्टोअरेज फॅसिलिटी युनिटप्रमाणे सांगण्यात आली. तर विस्तारिकरणामुळे सर्वात ज़ास्त फरक हा स्टोअरेज (साठवण) आणि सेग्रेगेशन (विलगीकरण) यात होणार आहे. तर सदरहू स्टोअरेज (साठवण) आणि सेग्रेगेशन (विलगीकरण) क्षेत्र हे विस्तारिकरणामुळे येणा-या अतिरिक्त जैव-वैदकीय कच-यासाठी सक्षम आहे का? आपण सांगितले की आपल्याकडे २.० टन जैव-वैदकीय कचरा रोज येईल किंवा त्यापेक्षा जास्त येऊ शकते. . मुद्द्याची नोंद ईआय अहवालात करण्यात यावी. कार्यरत प्रकल्पातील साठवण क्षेत्र व विस्तारिकरणामुळे केलेले साठवण क्षेत्र याची माहिती देण्यात यावी.

क) सादरीकरणात परिसरातील पर्यावरण योजनांसाठी राखीव निधी व प्रस्तावित ख़र्च याची माहिती देणे अपेक्षित होते,लोकांना आनंद झाला असता की सदरहू फॅसिलिटी सामाजिक क्षेत्रातही काम करणार आहे. आता त्याचा उल्लेख ईआयए अहवालात करण्यात यावी.

ड) बैठकीत एका व्यक्तीने प्रश्न विचारला होता की प्रकल्पात सिरिंगज, सलाईन बाटल्या येतील त्यांचे विलगीकरण करुन ज्याचा त्या प्लॅस्टिकचा पुनर्वापर करता येणार असेल, तर त्यासाठी रेकॉर्डकिपिंग असणे आवश्यक आहे. तर लोकांच्या मनात जी शंका आहे की बीएमड्ब्लयू याची पुनर्वापर होतो काय.



Scanned with OKEN Scanner

ई) प्रकल्पातील हवा प्रदूषणाबाबत मुद्दा उपस्थित झाला. प आपल्या या प्रकल्पात सतत ऑनलाईन मॉनिटरिंग व्यवस्था असणार आहे. तर येथील दत्त चौकात किवा नगरपालिकेशी संलग्न करुन आपण प्रकल्पातील रोजची हवा प्रदूषण स्थिती तेथे दर्शवू शकतात.

वरिल सूचनांचा ईआयए अहवालात अंतर्भाव करण्यात यावा.

आयोजक यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले व मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले,

अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांना १ लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत (सोबत जोडले आहे ).

Amol Satpute

(अमोल सातपुते)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
सातारा

(प्रशांत गायकवाड)
प्रतिनिधी, सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-पुणे
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
पुणे

(नागेश पाटील)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा
जिल्हा - सातारा



Scanned with OKEN Scanner